॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

अहिल्यानगर | बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक ९४ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

*** सुविचार ***

परिस्थिती कशीही असो, चेहऱ्यावरचं हास्य कधीही कमी होऊ देऊ नका.

# विखे, राजळे, लहामटे यांच्या उमेदवारीवर हरकती

## सर्व अर्जांची छाननी पूर्ण । कर्ज थकबाकी, प्रमाणपत्र आणि सूचकांच्या स्वाक्षरीवर आक्षेप – आज सकाळी ११ वाजता निर्णय

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत दाखल झालेल्या ३६९ उमेदवारी अर्जांची मंगळवारी छाननी करण्यात आली. माजी खासदार डॉ. सुजय विखे, आमदार किरण लहामटे, आमदार मोनिका राजळे, डॉ. प्रणोती जगताप यांच्यासह प्रमुख उमेदवारांच्या उमेदवारी अर्जांवर हरकती दाखल झाल्या आहेत. या हरकतींवर सुनावणी पूर्ण झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे आज, बुधवारी सकाळी ११ वाजता निर्णय जाहीर करणार आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे, सहायक निवडणूक अधिकारी देविदास घोडेचोर आणि रावसाहेब खेडकर यांच्या उपस्थितीत मतदारसंघनिहाय अर्जांची छाननी करण्यात आली. उमेदवारी अर्ज योग्य पद्धतीने दाखल झाला आहे का, उमेदवार तसेच सूचक व अनुमोदकांनी आवश्यक कागदपत्रे जोडली आहेत का, याची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर अर्जांवर दाखल झालेल्या हरकतींचीही सुनावणी घेण्यात आली.

कागदपत्रांमध्ये त्रुटी असलेल्या उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. त्यामुळे निवडणूक कार्यालयात दिवसभर उमेदवार, सूचक, अनुमोदक आणि वकिलांची गर्दी होती. सायंकाळी हरकतींवरील सुनावणी पूर्ण करण्यात आली.

राहाता सेवा सोसायटी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केलेले माजी खासदार डॉ. सुजय विखे आणि त्यांचे प्रतिस्पर्धी एकनाथ चंद्रभान घोगरे यांनी परस्परांच्या उमेदवारीवर हरकत घेतली आहे. घोगरे यांनी ड. सुरेश लगड यांच्यामार्फत विखे हे राहुरी कारखान्यासाठी जिल्हा बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे थकबाकीदार असल्याचा आक्षेप घेतला.

दुसरीकडे, एकनाथ घोगरे यांच्या उमेदवारी अर्जावरील सूचकाने आपली स्वाक्षरी नसल्याचे सांगितल्याने त्याचा 'इन कॅमेरा' जबाब नोंदविण्यात आला. या दोन्ही हरकतींवर आज निर्णय होणार आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजीतसिंह देशमुख यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी चित्रा विठ्ठल गायकवाड यांच्या उमेदवारी अर्जावर हरकत घेतली आहे. गायकवाड यांच्या सूचकाने अर्जावरील स्वाक्षरी आपली नसल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांसमोर सांगितल्याने या प्रकरणाकडे लक्ष लागले आहे. यावरही आज निर्णय होणार आहे.

आमदार मोनिका राजळे यांच्या उमेदवारी




अर्जावर प्रतिस्पर्धी कडूचंद शेटे यांनी ॲड. गोरक्ष पालवे यांच्यामार्फत हरकत दाखल केली आहे. राजळे या वृद्धेश्वर साखर कारखान्याच्या थकबाकीदार असल्याचा आक्षेप त्यात घेण्यात आला आहे. या हरकतीवरही निर्णय राखून ठेवण्यात आला आहे.

आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या उमेदवारी अर्जावर माजी आमदार वैभव पिचड यांनी हरकत घेतली आहे. अनुभवाचे प्रमाणपत्र चुकीचे किंवा बनावट असल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. हा आक्षेप चुकीचा असल्याचे लहामटे यांनी सांगितले आहे. या प्रकरणाचा निर्णयही आज जाहीर होणार आहे.

माजी आमदार राहुल जगताप यांच्या पत्नी डॉ. प्रणोती जगताप यांच्या उमेदवारी अर्जावर प्रतिस्पर्धी उमेदवार प्रतापसिंह पाचपुते यांनी हरकत घेतली आहे. जगताप यांच्या संबंधित साखर कारखान्याच्या थकबाकीचा मुद्दा हरकतीत उपस्थित करण्यात आला आहे. यावर डॉ. जगताप यांच्या वकिलांकडून खुलासा करण्यात आला असून निर्णय राखून ठेवण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालकपदांसाठी एकूण ३६९ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे आजच्या छाननीच्या निर्णयानंतर निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे.

### दहा वर्षांच्या संचालकपदाच्या नियमाकडे लक्ष

■ सलग दहा वर्षे संचालक म्हणून राहण्यासंदर्भातील नियमाचा मुद्दाही काही उमेदवारांच्या पात्रतेच्या संदर्भात चर्चेत आहे. माजी संचालक सिताराम गायकर, माजी आमदार चंद्रशेखर घुले आणि माजी संचालक अंबादास पिसाळ यांच्या उमेदवारीबाबत या नियमाचा परिणाम होतो का, याचा निर्णयही आज होणार आहे. मात्र या तिघांच्या उमेदवारी अर्जांवर या मुद्द्यावरून प्रतिस्पर्धी उमेदवारांनी स्वतंत्र हरकत दाखल केलेली नसल्याचे सांगण्यात आले आहे.

## SPOT NEWS



### मराठमोळी स्मृती मानधना भारतीय संघाची कर्णधार

**● मुंबई –** हरमनप्रीतने कर्णधारपद सोडल्यानंतर महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार कोण याची चर्चा सुरु होती. काही वेळातच मराठमोळ्या स्मृती मानधनाच्या नावाची घोषणा बीसीसीआयने केली. बीसीसीआयने गुवाहाटी येथे झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. मानधना दीर्घकाळापासून संघाची उपकर्णधार म्हणून कार्यरत होती. ती हरमनप्रीतच्या मार्गदर्शनाखाली खूप काही शिकली. तसेच हरमनप्रीतच्या अनुपस्थितीत वेळोवेळी तिने संघाचे नेतृत्वही केले. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला २०२४ आणि २०२६ मध्ये महिला प्रीमियर लीगचे विजेतेपद मिळवून देऊन तिने कर्णधार म्हणून आपली क्षमता यापूर्वीच सिद्ध केली आहे. स्मृती २०१३ पासून भारतीय संघाचा भाग आहे आणि या भूमिकेसाठी तिच्याकडे दांडगा अनुभव आहे. सध्या मानधनाची एकदिवसीय आणि टी-२० फॉरमॅटसाठी कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तिने यापूर्वी १८ टी-२० आंतरराष्ट्रीय आणि ४ एकदिवसीय सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले. बीसीसीआयचे अध्यक्ष मिथुन मिन्हास यांनी मानधनाच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास व्यक्त केला आणि तिने स्वतःला यापूर्वीच सिद्ध करून दाखवल्याचे सांगितले.

### रशियात अज्ञात विषाणूमुळे मृत्यू

**● मास्को –** रशियामध्ये एका अज्ञात विषाणूमुळे प्रयोगशाळेतील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. १९७ जणांना क्वॉरंटाइन करण्यात आले आहे. प्लेग संशोधन प्रयोगशाळेत विषाणूचा नमुना असलेली टेस्ट ट्यूब फुटली होती. ही महिला अँटी-प्लेग संशोधन संस्थेत काम करत होती. अमेरिकेच्या तपास यंत्रणा एफबीआयने लॉस एंजेलिस विमानतळावरून वॅनयिंग झांग ऊर्फ हीदर झांग महिलेला अटक केली. या महिलेवर चीन सरकारसाठी काम करत तैवानचे राष्ट्राध्यक्ष लाई चिंग-ते यांच्या मुलावर पाळत ठेवून त्याची छायाचित्रे आणि व्हीडीओ चीनला पाठवल्याचा आरोप आहे.

## दुष्काळी परिस्थितीचे १२ ऑक्टोबरपर्यंत पंचनामे पूर्ण करणार

**● मुंबई । वीरभूमी –**

राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थिती पाहता शासकीय यंत्रणांना कोणतीही सुटी न घेता युद्धपातळीवर पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आतापर्यंत राज्यात ४४ टक्के पंचनामे पूर्ण झाले असून, येत्या १० ते २ ऑक्टोबरपर्यंत १०० टक्के काम पूर्ण होईल अशी माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

पंचनाम्यांच्या सद्य:स्थितीची अधिकृत आकडेवारी मांडताना कृषमंत्री म्हणाले, राज्यातील बाधित १ कोटी ४९ लाख हेक्टर क्षेत्रापैकी आतापर्यंत सरासरी ४४ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक ६८ टक्के, अमरावतीत ५५ टक्के, पुण्यात ३० टक्के आणि नागपूर विभागात २५ टक्के काम झाले आहे. १० ते १२ऑक्टोबरपर्यंत सर्व पंचनामे १०० टक्के पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. एखाद-दुसरा दिवस मागे-पुढे झाला तरी अहवाल तातडीने तयार करून केंद्राकडे पाठवला जाईल. वरवर पाहता किंवा उपग्रहावरून शेत हिरवे दिसत असले, तरी प्रत्यक्षात पावसाअभावी शेंगांमधील दाणे भरलेले नाहीत आणि पिकांची वाढ खुंटलेली आहे. हे वास्तव केंद्रीय पथकासमोर मांडले जाईल. केंद्रीय पथक दोन दिवसांत पाहणीसाठी राज्यात येत असून केंद्र आणि राज्य सरकार मिळून शेतकऱ्यांना भरीव मदत देईल. दुष्काळी यादीतून सुटलेल्या तालुक्यांबाबत विचारले असता भरणे यांनी स्पष्ट केले. महाबळेश्वर, पाटणसारख्या तालुक्यांसोबतच दुष्काळी पट्ट्यातील कोरेगाव, जावळी किंवा इतर ज्या भागात पिके पूर्णपणे जळून पिवळी पडली आहेत.

## अहिल्यानगर एमडी ड्रग्ज प्रकरणात ५८ आरोपी निष्पन्न

### २१ अटकेत । पुरवठादार, विक्रेते आणि सेवन करणाऱ्यांचा समावेश

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील सावेडी उपनगरातील मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ जप्तीच्या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केल्यानंतर आतापर्यंत ५८ संशयित आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी २१ जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये अमली पदार्थांचा पुरवठा करणारे, विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्यांचा समावेश असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी मंगळवारी पत्रकारांना दिली.

गेल्या जुलैमध्ये तोफखाना पोलिसांनी सावेडी उपनगरातील मिस्किन मळा परिसरात एका मोटारीवर कारवाई केली होती. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये सुमारे १५० ग्रॅम मेफेड्रोन आढळून आले होते. याप्रकरणी गुन्हा दाखल करून काही आरोपींना अटक करण्यात आली होती. अटक आरोपींच्या घरझडतीदरम्यान आणखी सुमारे पाच ग्रॅम अमली पदार्थ आढळल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणाच्या तपासात तोफखाना पोलिसांकडून हलगर्जीपणा झाल्याचा ठपका ठेवत पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीचा तपास सुरू केला.

तपासादरम्यान अमली पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींपर्यंत पोलिस पोहोचले. तसेच अहिल्यानगर शहरात एमडीची विक्री करणाऱ्या व्यक्तींची माहिती मिळवून त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली. तपासात अमली पदार्थांचे सेवन करणारे काहीजण निष्पन्न झाल्याने त्यांनाही या गुन्ह्यात आरोपी करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

आतापर्यंत एकूण ५८ संशयित आरोपी निष्पन्न झाले असून, त्यापैकी २१ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित संशयितांचा शोध सुरू असून पसार आरोपींनाही लवकरच अटक केली जाईल, असे अधीक्षक सुदर्शन यांनी सांगितले. अमली पदार्थांची विक्री किंवा सेवन करणाऱ्यांबाबतची माहिती नागरिकांनी पोलिसांना द्यावी. नागरिकांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे कारवाई करण्यास पोलिसांना मदत होईल. अहिल्यानगर अमली पदार्थमुक्त करण्याच्या मोहिमेत नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी सांगितले.

### 'ड्रग्स फ्री अहिल्यानगर' मोहीम

■ दरम्यान, जिल्हा पोलीस दलाकडून 'ड्रग्स फ्री अहिल्यानगर' ही मोहीम राबविण्यात येत आहे. शहरासह जिल्ह्यात अमली पदार्थांविरोधात कारवाई सुरु असून, नागरिकांनीही या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# वन्यजीव सप्ताहानिमित्त पाथर्डीत विद्यार्थ्यांना वन्यजीव संवर्धनाचा धडा

## जिल्हा परिषद शाळेत वनविभागाच्या वतीने जनजागृती । वृक्षारोपणासह विविध उपक्रम उत्साहात

**● पाथर्डी । वीरभूमी –**

वन्यजीवांचे संरक्षण, निसर्ग संवर्धन आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजावे, यासाठी वनविभागाच्या वतीने पाथर्डी तालुक्यात १ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत वन्यजीव सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त पाथर्डी शहरातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी वन्यजीव संवर्धन, निसर्ग संरक्षण आणि पर्यावरणविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी वृक्षारोपणही करण्यात आले.

वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून वन्यजीव आणि मानव यांच्यातील परस्परसंबंध, जंगलांचे महत्त्व, जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोल याबाबत मार्गदर्शन केले. पाळीव प्राणी, वन्य प्राणी, सर्प तसेच विविध पशुपक्ष्यांची माहिती देताना त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले.

वन्यजीव हे केवळ जंगलाचे वैभव नसून पर्यावरणीय साखळीतील महत्त्वाचे घटक आहेत. जंगलातील एखाद्या घटकाचे अस्तित्व धोक्यात आल्यास त्याचा परिणाम संपूर्ण पर्यावरणावर होऊ शकतो. त्यामुळे वन्यजीवांचे संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि निसर्गाशी सुसंवाद राखणे काळाची गरज असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

विद्यार्थ्यांना सर्पविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. साप दिसल्यास घाबरून न जाता त्याला इजा करू नये. संबंधित वनविभाग किंवा प्रशिक्षित सर्पमित्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. वन्यजीवांविषयी असलेले गैरसमज दूर करून विद्यार्थ्यांमध्ये प्राणी-पक्ष्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्यावरही भर देण्यात आला.

वनपरिक्षेत्राधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ७ ऑक्टोबरदरम्यान पाथर्डी तालुक्यात वन्यजीव सप्ताहानिमित्त विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांनीही पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.




यावेळी परिमंडळ अधिकारी बबन मंचरे, पांडुरंग वेताळ, वनरक्षक हरिभाऊ बारगजे, सविता रायकर, सागर साळवे, बाळासाहेब मरकड, अनिल आरगडे, सर्पमित्र सुशांत मनवरे, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा तुपे, मुख्याध्यापक राजू गोल्हार, शिक्षिका शिला नागरे, अनुराधा तरवडे, ज्योती जाधव, छाया चंदनशिव, भावना देवरे, अर्चना खाडे, सुरेखा बडे, मनिषा फटांगरे आदी उपस्थित होते. शाळेच्या वतीने भावना देवरे यांनी वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानून उपस्थितांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# SPOT NEWS

## वाळकीत भटके-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वाटप

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने वाळकी (ता. नगर) येथील तिरमल वस्ती येथे भटके-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांसाठी जात प्रमाणपत्र वाटप मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. संघटनेने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात पात्र विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे भटके-विमुक्त राज्यप्रमुख रविकांत राठोड यांच्या हस्ते लाभार्थी विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जात प्रमाणपत्रामुळे भटके-विमुक्त समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, विविध शासकीय योजना तसेच शासनाच्या आरक्षणाच्या सुविधांचा लाभ घेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे या उपक्रमाचे लाभार्थी विद्यार्थ्यांसह पालकांनी स्वागत केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस व्हीजेएनटीचे प्रदेश उपाध्यक्ष अंबादास धनगर, सरचिटणीस अशोक जाधव, टिशाताई माडेवार, नाशिक जिल्हाध्यक्ष अजित शिंदे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, छावा भटके-विमुक्तचे जिल्हाप्रमुख उत्तम पवार, उपप्रदेशाध्यक्ष कल्याण राठोड, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष योगेश वामन, श्रीधर शेलार, नगर तालुका नायब तहसीलदार अभिजीत वांढेकर, मंडळ अधिकारी भाऊसाहेब नांदुरकर, तलाठी मिसाळ, आनंद गायकवाड, बजरंग काकडे, योगेश खेंडके, सारोळे जेऊघाले, अर्चना परकाळे, वाळकीचे सरपंच शरद बोठे, शिवसेना उपतालुका प्रमुख दामोदर भालसिंग, बाबू काकडे आदी उपस्थित होते.

## केडगावात १५ वर्षांखालील बास्केटबॉल खेळाडूंची जिल्हास्तरीय निवड चाचणी उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

तळागाळातील बास्केटबॉल खेळाला चालना देऊन गुणवंत खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमी, पुणे यांच्या वतीने आयोजित १५ वर्षांखालील मुला-मुलींच्या लीग स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याची निवड चाचणी केडगाव येथील ऊर्जा गुरुकुल शाळेच्या मैदानावर उत्साहात पार पडली. या निवड चाचणीचे आयोजन केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने करण्यात आले. या निवड चाचणीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध बास्केटबॉल क्लबमधील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपले कौशल्य सादर केले. केडगाव स्पोर्ट्स अकॅडमी, पोलीस बॉईज बास्केटबॉल क्लब अहिल्यानगर, एबीसी बास्केटबॉल क्लब अहिल्यानगर, बॉलर्स अकॅडमी अहिल्यानगर, एसबीसी सावेडी-अहिल्यानगर तसेच एसबीसी श्रीरामपूर या संघांतील खेळाडूंनी निवड चाचणीत सहभाग घेतला. निवड चाचणीदरम्यान खेळाडूंची बास्केटबॉल खेळाशी संबंधित शारीरिक क्षमता, फिटनेस, मूलभूत बास्केटबॉल कौशल्ये तसेच प्रत्यक्ष सामन्यातील खेळाचे निरीक्षण करून त्यांची गुणवत्ता तपासण्यात आली. या विविध निकषांच्या आधारे उत्कृष्ट खेळाडूंची मुख्य लीग स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे. या निवड प्रक्रियेसाठी संभाजी कदम अकॅडमीचे संचालक शरद नागणे सर, उत्तेकर सर, धनंजय नाखले, गणेश नागणे सर तसेच इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स सायन्स अँड टेक्नॉलॉजी, पुणे येथील तज्ज्ञ टीम उपस्थित होती. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंच्या कौशल्याची बारकाईने पाहणी करण्यात आली. निवड झालेल्या खेळाडूंचे स्वतंत्र संघ तयार करून त्यांचे नियोजनबद्ध सराव सत्र घेण्यात येणार आहे.

# ‘फर्स्ट इन फर्स्ट आउट’ पद्धतीने शेतरस्ता प्रकरणे निकाली काढा

### शरद पवळे । पाथर्डी तहसील कार्यालयात तहसीलदारांची शेतकऱ्यांसमवेत बैठक

● **पाथर्डी । वीरभूमी –**

तालुक्यातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली शिवपाणंद शेतरस्त्यांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने ‘मिशन झिरो पेंडन्सी’ अभियान राबविण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन ‘फर्स्ट इन फर्स्ट आउट’ पद्धतीने त्यावर कार्यवाही करण्याचा तालुकास्तरीय कृती आराखडा तयार करण्याच्या मागणीसाठी पाथर्डी तहसील कार्यालयावर महाचर्चेचे आयोजन करण्यात आले.



महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे आणि उपाध्यक्ष नाथाभाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पाथर्डी तालुका शिवपाणंद शेतरस्ते कृती समितीच्या पुढाकाराने ही महाचर्चा झाली. यावेळी शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. त्यानंतर तहसीलदार उद्धव नाईक यांनी संबंधित विभागांची तातडीने बैठक बोलावून शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

शरद पवळे यांनी तहसील कार्यालयाकडे प्रलंबित असलेल्या शेतरस्ता प्रकरणांची यादी मागविली. या यादीमध्ये अनेक जुनी प्रकरणे अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्याचे चळवळीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

शिवपाणंद शेतरस्त्यांच्या प्रश्नावर राज्य सरकारने शासननिर्णय काढले आहेत. मात्र, प्रत्यक्षात सर्व प्रलंबित प्रकरणांवर समान आणि पारदर्शक पद्धतीने कार्यवाही होत नसल्याचा आरोप शरद पवळे यांनी केला. काही ठिकाणी प्रभावशाली लोकप्रतिनिधींच्या भागातील कामांना प्राधान्य मिळत असल्याचा दावा करत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित केले.

खऱ्या गरजू शेतकऱ्यांची शेतरस्ता प्रकरणे ‘फर्स्ट इन फर्स्ट आउट’ पद्धतीने निकाली काढावीत. नकाशावरील रस्त्यांना शाश्वत हद्दीखुणा निश्चित कराव्यात, वहिवाटीच्या रस्त्यांची रुंदी नकाशावर नोंदवावी, रस्त्यांच्या इतर अधिकारात नोंदी घ्याव्यात तसेच प्रशासकीय अथवा न्यायालयीन आदेश झालेले शेतरस्ते मजबुतीकरणासाठी प्राधान्याने घ्यावेत, अशी मागणी पवळे यांनी केली.

तहसीलदार उद्धव नाईक यांनी तातडीने लोकअदालतीचे आयोजन करून ‘मिशन झिरो पेंडन्सी’अंतर्गत ‘फर्स्ट इन फर्स्ट आउट’ पद्धतीने प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, शेतरस्ता प्रकरणांमध्ये कार्यालयातील कोणत्याही व्यक्तीने पैसे मागितल्यास आंदोलनाची दिशा बदलण्याचा इशारा शरद पवळे यांनी दिला.

यावेळी चळवळीचे ज्येष्ठ नेते पोपट शेळके, रमेश कचरे, विठ्ठल निर्मळ, नाथाभाऊ शिंदे, रविंद्र खुडे, बाळासाहेब थोरात, अंबादास आव्हाड, अशोक कचरे, विकास जाधव, सोमनाथ तोडमल, आशा वाघ, सविता मरकड, शिराज पठाण यांच्यासह चळवळीचे पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोपट शेळके, रमेश कचरे आणि विठ्ठल निर्मळ यांनी आभार मानले.

## डॉ. नानासाहेब गायकवाड यांचा ‘आदर्श प्राचार्य’ पुरस्काराने सन्मान




● **कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील मढी खुर्द गावचे भूमिपुत्र, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आणि अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचरचे विद्यमान प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड यांचा रयत शिक्षण संस्थेच्या १०७ व्या वर्धापन दिनानिमित्त ‘आदर्श प्राचार्य’ पुरस्काराने गौरव करण्यात आला. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक कारकिर्दीतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत मिळालेला हा सन्मान मढी खुर्दसह संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा पुढे नेत डॉ. गायकवाड यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. प्राचार्य म्हणून त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले. शैक्षणिक, प्रशासकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची विशेष दखल घेण्यात आली.

प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदान करण्यात येणारा ‘आदर्श प्राचार्य’ पुरस्कार हा त्यांच्या कार्याचा गौरव करणारा असून, रयत शिक्षण संस्थेच्या मूल्याधिष्ठित शैक्षणिक परंपरेत त्यांनी दिलेल्या योगदानाची पोचपावती आहे. या पुरस्कारामुळे शैक्षणिक आणि सामाजिक लौकिकात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या सन्मानामुळे मढी खुर्दच्या भूमिपुत्राचा शैक्षणिक क्षेत्रातील कर्तृत्वाचा गौरव झाला असून, ‘गावच्या मातीतून घडलेले कर्तृत्व, शिक्षणाच्या क्षेत्रात उमटवते अमीट ठसा’ अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

### जिल्हा भाजपच्या वतीने आज अहिल्यानगर शहरात

# विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे आयोजन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय व सामाजिक कारकीर्दीस २५ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने अहिल्यानगर जिल्हा व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने बुधवारी ७ ऑक्टोबर रोजी विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे आयोजन शहरात केले आहे. सकाळी ९ वाजता आनंदधाम समोरील केशर गुलाब मंगल कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहीती शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहीते यांनी दिली.




नरेंद्र मोदी यांच्या गुजरातचे मुख्यमंत्री ते पंतप्रधान या कारकिर्दीला यंदा २५ वर्ष पूर्ण झाली आहेत. याचा अभिमान आहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व भाजपच्या पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांना आहे. यानिमित्ताने बुधवारी विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे केले असून सकाळी ९ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्य प्रणालीद्वारे विकसित भारत संकल्प सभेस मार्गदर्शन करून पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरीकांशी संवाद साधणार आहेत. या संकल्प सभेस विधानपरीषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, आ. मोनिका राजळे, आ. विक्रमसिंह पाचपुते, आ. अक्षय कर्डीले, आ. प्राजक्त तनपुरे, आ. विवेक कोल्हे, जिल्हा प्रभारी माजी आमदार राम सातपुते, लक्ष्मण सावजी व भैरवी वाघ-पलांडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित राहाणार असल्याचे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी सांगितले.

संकल्प सभेनंतर सेवा ज्योती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेस केशर गुलाब मंगल कार्यालयापासून प्रारंभ होऊन शहरातील महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदीरात महाआरतीने यात्रेचा समारोप होईल.

यासर्व कार्यक्रमास जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले आहे.

# नवरात्रोत्सवासाठी अमरापूरच्या ३० भाविकांचे माहूरकडे पायी ज्योत आणण्यासाठी प्रस्थान

### श्रीरेणुकामाता देवस्थान नवरात्रोत्सवासाठी सज्ज । ४०० किलोमीटरचा पायी प्रवास करून ११ ऑक्टोबरला ज्योत अमरापूरला आणणार

● **शेवगाव । वीरभूमी–**

श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानात शारदीय नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. नवरात्रोत्सवानिमित्त श्रीक्षेत्र माहूर येथून पायी ज्योत आणण्यासाठी अमरापूर येथील ३० भाविक मंगळवारी (दि. ६) माहूरकडे रवाना झाले.



श्री रेणुकामाता भक्तानुरागी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, पहिल्या लोकनियुक्त माजी महिला नगराध्यक्षा जनाबाई घोडके, पत्रकार प्रा. जनार्दन लांडे पाटील आणि डॉ. अरविंद पोटफोडे यांच्या हस्ते ज्योतीचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर श्री रेणुका मातेची आरती करून पायी ज्योत आणण्यासाठी जाणाऱ्या भाविकांना निरोप देण्यात आला.

यावेळी श्री रेणुकामाता परिवारातील पांडुरंग देवकर, राजेंद्र नांगरे, अश्वलिंग जगनाडे, गणेश गाडे, सचिन जाखडे, गजानन वाघ, राहुल वाघमारे, गणेश बळे, कृष्णा महाराज मुळीक, संभाजी पंडित, देविदास झरेकर, अनिकेत गायकवाड, हृतिक देशपांडे, अमरनाथ साळवे, सुरेश गाडे, गंपू गाडे, महेश कर्डिले, अभिषेक शिंपी, बारकु बच्छाव, गौतम शिंदे, सचिन सांगळे, अंकुश म्हस्के, बाजीराव बुधवंत, ॲड. तनपुरे आदी ३० भाविक सहभागी झाले आहेत.

रविवारी (दि. ११) सकाळी आईसाहेबांची महापूजा, शतचंडी याग आणि घटस्थापनेने नवरात्रोत्सवाला प्रारंभ होणार आहे. प्रधान आचार्य वेदशास्त्रसंपन्न सचिन देवा देशपांडे, तुषार देवा वैद्य, रमेश देवा भोंग आणि देवस्थानचे ब्रह्मवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवाच्या काळात विविध पूजा-अर्चांचे आयोजन करण्यात आले आहे.

पाचव्या माळेला गुरुवारी (दि. १५) भगवतीभक्त कै. चंद्रकांत दादा भालेराव यांच्या पुण्यस्मरणानिमित्त तारकेश्वर गडाचे महंत शांतिब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी (दि. २०) सकाळी ९ वाजता आखेगाव येथील जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रवर्तक हभप राम महाराज झिंजुर्के यांचे हरिकीर्तन होणार आहे. दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसाद, सायंकाळी ५ ते ६ या वेळेत भगवान परशुराम पालखी, सीमोल्लंघन, शस्त्रपूजन आणि नवरात्रोत्सवाची सांगता होणार आहे.

श्री रेणुकामाता भक्तानुरागी डॉ. प्रशांत (नाना) भालेराव हे आपले सर्व व्याप बाजूला ठेवून संपूर्ण नवरात्रोत्सवाच्या काळात देवस्थानात उपस्थित राहून मातेच्या चरणी सेवा करतात.

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या श्रीक्षेत्र माहूरच्या श्री रेणुकामाता देवीचे श्रीक्षेत्र अमरापूर हे ठाणे मानले जाते. नवसाला पावणारी आणि भक्तांच्या हाकेला धावून येणारी श्री रेणुकामाता, अशी भाविकांची श्रद्धा असल्याने हे देवस्थान श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध झाले आहे. त्यामुळे नवरात्रोत्सव काळात येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. काही विदेशी भक्तही देवस्थानाला नियमित भेट देत असल्याचे सांगण्यात आले.

### विद्युत रोषणाईने देवस्थान उजळले

■ नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थान परिसराची स्वच्छता आणि सजावट करण्यात आली आहे. हजारो वृक्षांनी नटलेल्या देवस्थान परिसरातील मंदिरांसह तीन मजली भव्य भक्तनिवासावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून परिसर उजळून निघाला आहे.

### ‘जय जगदंब’च्या जयघोषात प्रवास

■ ४०० किलोमीटरचा प्रवास ‘जय जगदंब, जय जगदंब’चा जयघोष करत हे भाविक पायी ज्योत घेऊन अमरापूरकडे परतणार आहेत. सकाळी साडेअकरा आणि सायंकाळी साडेसहा वाजता ते जेथे असतील तेथे थांबून ज्योतीचे पूजन व आरती करण्यात येणार आहे. सुमारे ४०० किलोमीटरचा पायी प्रवास पूर्ण करून रविवारी (दि. ११) दुपारपर्यंत ज्योत श्री रेणुकामाता देवस्थान, अमरापूर येथे पोहोचणार आहेत.

## SPOT NEWS

### ज्येष्ठ कवयित्री हेमलता गीते यांचा 'भारत गौरव श्री' पुरस्काराने सन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

येथील ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गीते यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत नवी मुंबई येथील कला साधना सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांना 'भारत गौरव श्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कामोठे, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्या हस्ते हेमलता गीते यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी प्राचार्य डॉ. रत्नाकर अहिरे, प्रसिद्ध जादूगार सतीश देशमुख, कला साधना सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष मेघा महाजन, श्रीराम महाजन यांच्यासह साहित्य, कला व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हेमलता गीते या मराठी साहित्यविश्वात संवेदनशील, अभ्यासू आणि प्रभावी कवयित्री म्हणून परिचित आहेत. आपल्या लेखणीतून विविध सामाजिक, मानवी आणि भावनिक विषयांना त्यांनी सातत्याने अभिव्यक्ती दिली आहे. त्यांच्या कवितांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक जाणिवा आणि जीवनानुभवांचे प्रतिबिंब दिसून येते. कविता लिहिण्याबरोबरच त्या प्रभावी काव्यवाचक म्हणूनही रसिकांमध्ये विशेष परिचित आहेत. उत्कृष्ट काव्यलेखन, प्रभावी काव्यसादरीकरण आणि ललित साहित्य निर्मिती या क्षेत्रांमध्ये हेमलता गीते यांनी केलेल्या भरीव कार्याची विविध संस्थांनी दखल घेतली आहे. त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीत आजवर सुमारे दीडशेहून अधिक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानामुळे त्यांनी मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. दिल्ली येथील दलित साहित्य अकादमीचा प्रतिष्ठेचा 'वीरांगना सावित्रीबाई फुले फेलोशिप अवॉर्ड' यासह विविध मानाचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. काव्यलेखनासोबतच साहित्यवाचन, काव्यसादरीकरण आणि ललित लेखनाच्या माध्यमातून त्यांनी साहित्य रसिकांशी सातत्याने संवाद साधला आहे.

### विश्व मांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सौ.रजनी मनोज भंडारी

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

पुणे येथे दिनांक ३ व ४ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या



विश्वमांगल्य सभा,पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वार्षिक बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये सौ. रजनी मनोज भंडारी यांची विश्वमांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. महिला सक्षमीकरण, सामाजिक जागृती, संस्कार आणि समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. यावेळी अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख सौ. स्वाती शिरसुल,अहिल्यानगर जिल्हा सहसंपर्क प्रमुख सौ.स्वाती पवळे,जिल्हा सदाचार सभा संयोजिका सौ.शिल्पा भदाणे, तर सौ.रूपाली मोहिते यांची जिल्हा बालसभा संयोजिका म्हणून नियुक्ती करण्यात आली. रजनी भंडारी व नूतन पदाधिकाऱ्यांचे सौ. धनश्री विखे सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# ढोल-ताशांच्या गजरात तुळजाभवानी पालखीचे गावोगावी स्वागत

## ८०० वर्षांची परंपरा असलेल्या पालखीचे १२ ऑक्टोबरला नगर शहरात आगमन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



नगरजवळील बुऱ्हाणनगर येथील भगत मानकरी असलेल्या आणि सुमारे ८०० वर्षांची परंपरा लाभलेल्या तुळजाभवानी देवीच्या पालखीचे रविवारी (दि. १२ ऑक्टोबर) नगर शहरात आगमन होणार आहे. पालखीचे मानकरी सागर भगत यांनी ही माहिती दिली.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीची पालखी बुऱ्हाणनगर येथून राहुरी येथे नेऊन तेथे पालखीचा दांडा व पाळणा तयार केला जातो. त्यानंतर पालखी राहुरी, पारनेर आणि नगर तालुक्यातील विविध गावांतून मार्गक्रमण करत तुळजापूरकडे सीमोल्लंघनासाठी रवाना होते. पालखीचे प्रत्येक गावात भंडाऱ्याची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत केले जात आहे.

बुऱ्हाणनगर येथील देवी मंदिरातून पालखीचा दांडा व पाळणा तयार करण्यासाठी पालखी राहुरीकडे नेली जाते. तेथे पालखी तयार झाल्यानंतर ती दर्शनासाठी मंदिरात ठेवण्यात येते. २६ सप्टेंबरपासून पालखीच्या प्रवासाला सुरुवात झाली आहे.

रविवारी (दि. १२) पालखी हिंगणगाव येथून नगर शहरात दाखल होणार आहे. दिवसभर नालेगाव, पोलीस हेडक्वॉर्टर, सर्जेपुरा आणि रामचंद्र खुंट येथे पालखीचा मुक्काम व दर्शनासाठी व्यवस्था करण्यात येणार असून त्यानंतर पालखी भिंगार कॅम्पमार्गे बुऱ्हाणनगरकडे रवाना होणार आहे.

पालखीच्या मार्गावरील गावांमध्ये परंपरेनुसार योग्य तिथी व वेळेनुसार यात्रा भरत असून भाविक दर्शनासाठी गर्दी करत आहेत. मुक्कामाच्या ठिकाणी देवीचा गोंधळ, भक्तिगीते आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भाविकांसाठी महाप्रसादाचेही वाटप करण्यात येत आहे.

नवरात्रातील तिसऱ्या माळेला भिंगार येथे पालखी आणि पलंगाची भेट मिरवणूक होते. दसऱ्याच्या दिवशी पहाटे सीमोल्लंघनासाठी पालखी तुळजापूर येथे पोहोचणार आहे. पालखीच्या प्रवासादरम्यान सुमारे ५० गावांना भेट दिली जाते.

तुळजापूरच्या तुळजाभवानी मातेसाठी पालखी घेऊन येण्याचा मान नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर गावाला असून येथील भगत परिवाराकडे हा मान आहे. दसऱ्याच्या सीमोल्लंघन सोहळ्यासाठी याच पालखीतून मूर्तीची मिरवणूक काढून मुख्य मंदिर परिसराला प्रदक्षिणा घातली जाते.

परंपरेनुसार सीमोल्लंघनाचा सोहळा पूर्ण झाल्यानंतर पालखी तोडून ती होमात अर्पण केली जाते. तुळजाभवानीची मूळ मूर्ती पलंगावर शयनासाठी ठेवण्याच्या परंपरेप्रमाणे सीमोल्लंघनाच्या दिवशी पालखीतील मूर्तीची मिरवणूक काढली जाते.

## लोकशाही संविधान सैनिकांचा जनसन्मान

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

लोकशाही आणि भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी शांततामय व घटनात्मक मार्गाने संघर्ष करणाऱ्या नागरिकांना 'लोकशाही संविधान सैनिक' म्हणून जनसन्मान देण्याची संकल्पना पीपल्स हेल्पलाइन व भारतीय जनसंसदेच्या माध्यमातून ज्येष्ठ विधिज्ञ ड. कारभारी गवळी यांनी मांडली आहे. 'बुई द पीपल ऑफ इंडिया-आम्ही भारताचे लोक' या लोकसंकल्पातून अशा नागरिकांचे योगदान पिढ्यानपिढ्या स्मरणात ठेवावे आणि त्यांच्या कार्यातून संविधाननिष्ठ 'संपूर्ण क्रांती'ची प्रेरणा देशभर पोहोचावी, अशी या उपक्रमाची भूमिका आहे.

दिल्लीतील जंतरमंतरपासून शहरांच्या गल्लीबोळांपर्यंत तसेच गावांच्या वाड्या-वस्त्यांपर्यंत लोकशाहीच्या संरक्षणासाठी आवाज उठविणारे नागरिक या जनसन्मानाच्या केंद्रस्थानी असतील. निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता, लोकशाही संस्थांची स्वायत्तता, नागरिकांचे अधिकार आणि सार्वजनिक सत्तेचे उत्तरदायित्व यासाठी अहिंसक आंदोलन, सत्याग्रह आणि लोकजागृती करणाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्याचा संकल्प या उपक्रमातून व्यक्त करण्यात आला आहे.

'संपूर्ण क्रांती' म्हणजे नागरिकांच्या विचारात, आचरणात, सामाजिक संबंधांत आणि शासनव्यवहारात संविधानिक मूल्ये रुजविण्याचा सातत्यपूर्ण लोकप्रयत्न असल्याचे या संकल्पनेत मांडण्यात आले आहे. सत्तेवरील व्यक्ती बदलण्याबरोबरच सत्तेच्या वापरातील मनमानी, भेदभाव, भ्रष्टाचार आणि जनतेप्रती असलेली उदासीनता दूर करण्यासाठी जागरूक नागरिकांचा सहभाग आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा तसेच सार्वजनिक निर्णयांचा आधार बनावीत, असा या लोकसंकल्पाचा आशय आहे. सार्वजनिक संस्था व पदाधिकाऱ्यांना प्रश्न विचारणे, त्यांच्या निर्णयांची चिकित्सा करणे आणि पारदर्शकतेची मागणी करणे ही लोकशाहीतील जागरूक नागरिकांची महत्त्वाची भूमिका असल्याचेही अधोरेखित करण्यात आले आहे.

लोकहितासाठी जबाबदारीने आवाज उठविणाऱ्या नागरिकांच्या योगदानाची समाजाने दखल घ्यावी, अशी भूमिका या उपक्रमाद्वारे मांडण्यात आली आहे. जनसन्मानाचा आधार नागरिकांची शांततामय कृती, सत्यनिष्ठा आणि संविधानाशी निष्ठा असेल. आंदोलनातील योगदानाचे मूल्यमापन जात, धर्म, पक्ष किंवा सामाजिक प्रतिष्ठेऐवजी नागरिकांचे अधिकार आणि सार्वजनिक हितासाठी केलेल्या कार्याच्या आधारे व्हावे, असेही या संकल्पनेत नमूद आहे.

## अगस्ती विद्यालयाच्या फुटबॉल संघांची जिल्हास्तरावर निवड

### १४ व १७ वर्षे वयोगटात तालुकास्तरीय स्पर्धेत विजेतेपद



**● अकोले । वीरभूमी–**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि तालुका क्रीडा समिती, अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय फुटबॉल तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा नुकत्याच उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत अगस्ती विद्यालय, अकोलेच्या १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद मिळविले.

दोन्ही संघांतील खेळाडूंनी सांघिक खेळ, भक्कम बचाव, आक्रमक चाली आणि खेळातील शिस्तीचे प्रभावी प्रदर्शन केले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर अगस्ती विद्यालयाच्या १४ व १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघांची जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेळाडूंना क्रीडा मार्गदर्शक शिक्षक ओम बाणाईत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण सराव करत तालुकास्तरीय स्पर्धेत यश मिळविले.

या यशाबद्दल अगस्ती शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्यवाहक शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, व्यवस्थापन समितीचे दत्ता नवले, दौलत कानवडे, प्रकाश साळवे, रामदास सोनवणे, शिवाजी धुमाळ, मंगेश खांबेकर तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि क्रीडाप्रेमींनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन केले. पुढील स्पर्धेसाठी खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.

# रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी आमदार आशुतोष काळे यांची निवड

**● कोपरगाव । वीरभूमी –**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीत कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांची मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाची जबाबदारी सांभाळतांना केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

रयत शिक्षण संस्थेशी काळे परिवाराचे अनेक दशकांपासूनचे अतूट नाते आहे. माजी खासदार कर्मवीर शंकरराव काळे साहेबांनी कोपरगाव सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून संस्थेला विविध प्रकारे सहकार्य करत रयतच्या शैक्षणिक विस्ताराला हातभार लावला. संस्थेच्या चेअरमनपदाची सलग पंधरा वर्षे जबाबदारी सांभाळताना रयतच्या विस्तारात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्याचा वारसा माजी आमदार अशोकराव काळे यांनी पुढे नेत संस्थेच्या शाळा-महाविद्यालयांच्या विविध प्रश्न, अडीअडचणी सातत्याने सोडविल्या. हि परंपरा पुढे घेवून जातांना आमदार आशुतोष काळे यांनीही संस्थेचे अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रयतच्या उत्तर विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर संस्थेच्या विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मविभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विचारांना केंद्रस्थानी ठेवून काळे परिवाराने रयतला नेहमीच प्राधान्य मानले आहे. उच्चशिक्षित असलेल्या आमदार आशुतोष काळे यांनी रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाची जबाबदारी समर्थपणे सांभाळताना शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून आणि वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच नव्या संधी



उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे उत्तर विभागाच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळाली असून, गुणवत्ता आणि संधी यांचा समतोल साधणारा प्रभावी ठसा त्यांच्या कार्यातून उमटला. त्यांच्या या कार्याची खा.शरदचंद्रजी पवार यांनी विशेष दखल घेत त्यांची मॅनेजिंग कौन्सिल सदस्यपदी निवड केली आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यक्षमतेचा संस्थेच्या आगामी वाटचालीत निश्चितपणे उपयोग होणार आहे.

> कर्मवीर भाऊराव पाटील आणि कर्मवीर शंकरराव काळे साहेबांनी जपलेल्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी पुन्हा माझ्यावर सोपविण्यात आली, हा माझ्यासाठी सन्मानासोबतच भावनिक क्षण आहे. आदरणीय खा.शरदचंद्रजी पवार साहेबांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि रयत परिवाराने दिलेले प्रेम ही माझी मोठी ताकद आहे. काळे परिवाराच्या संस्कारांचा वारसा जपत रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी यापुढेही पूर्ण क्षमतेने सदैव कार्यरत राहणार.
>
> **– आ. आशुतोष काळे**

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा



**● पारनेर । वीरभूमी –**

मराठी भाषेला ३ ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, पारनेर येथे अभिजात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रस्तावना व अध्यक्ष निवड शेळके मॅडम यांनी केली, तर थोरात मॅडम यांनी अनुमोदन दिले. यावेळी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

मराठी विभागप्रमुख मगर मॅडम यांनी मराठी भाषेची प्राचीनता, समृद्ध साहित्यपरंपरा व सांस्कृतिक वारसा याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, समर्थ रामदास आदी संत-साहित्यिकांच्या योगदानातून मराठी भाषेला लाभलेले वैभव त्यांनी स्पष्ट केले. यावेळी विद्यार्थ्यांनीही भाषणे केले

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य के. बी. शिंदे यांनी मराठीला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा हा महाराष्ट्राच्या इतिहास, साहित्य, संस्कृती व अस्मितेचा गौरव असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी मराठीचे वाचन, लेखन व संवर्धन करण्याचे आवाहन केले.यावेळी उपप्राचार्य संतोष इंगळे, पर्यवेक्षक अजित दिवटे यांच्यासह शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन मगर मॅडम यांनी केले, तर आभार निवडुंगे मॅडम यांनी मानले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी पाच रुपयांत शिवभोजन सुरू करा

## टँकर पाणीपुरवठ्याचा स्वतंत्र कृती आराखड्यासह चारा छावण्या सुरू करण्याची अकोले ग्रामस्थांची मागणी



**● पाथर्डी । वीरभूमी –**
ग्रामीण भागातील टंचाईग्रस्त नागरिकांना प्रति व्यक्ती किमान ५० लिटर, तर जनावरांना प्रति जनावर किमान १०० लिटर पाणी उपलब्ध करून द्यावे, टँकरच्या खेपा वाढवाव्यात, तसेच टँकर पुरवठ्याचे वेळापत्रक जाहीर करावे, या मागण्यांसाठी अकोले गावातील ग्रामस्थांनी स्थानिक प्रशासनासह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाष केकान यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. यावेळी गोविंद गर्जे, वसंत गर्जे, गणेश गर्जे, प्रशांत गोसावी, आनंद गोसावी, शहादेव गर्जे यांच्यासह विविध कार्यकर्ते उपस्थित होते.

गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांना निवेदन देताना केकान म्हणाले की, शासनाने हागणदारीमुक्त गाव अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे ग्रामीण भागात शौचालयांचा वापर अनिवार्य झाला आहे. मात्र, सध्या अनेक ठिकाणी शौचालयासाठीही पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांसमोर गंभीर अडचण निर्माण झाली आहे. ग्रामीण निकषानुसार माणशी २० लिटर पाणी दिले जात असले, तरी वाढलेल्या जीवनमानामुळे ही मात्रा अपुरी ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

दुभती जनावरे मोठ्या प्रमाणात असल्याने गाई-म्हशींच्या पिण्यासाठी तसेच देखभालीसाठी दररोज किमान १०० लिटर पाण्याची आवश्यकता असल्याचे केकान यांनी नमूद केले. जनावरांना पुरेसे पाणी न मिळाल्यास दूध उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने अकोले गावातील सर्व वाड्या-वस्त्यांसाठी टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठ्याचा स्वतंत्र कृती आराखडा तातडीने तयार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

कोणत्या क्रमांकाचा टँकर कोणत्या वस्तीवर, किती वाजता आणि किती खेपा करणार, याची स्पष्ट माहिती असलेले दैनंदिन वेळापत्रक ग्रामपंचायत कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावे. प्रत्येक टँकरसोबत ग्रामपंचायतीचा एक कर्मचारी नियुक्त करावा. कर्मचारी उपलब्ध नसल्यास रोजगार हमी योजनेतून त्याची नियुक्ती करावी, अशी मागणीही करण्यात आली.

तालुक्यात अनेक ठिकाणी टँकरच्या पाण्याचे समान वाटप करताना अडचणी निर्माण होत असल्याचे केकान यांनी सांगितले. बहुसंख्य ग्रामपंचायतींवर प्रशासक असताना माजी पदाधिकारी टँकरच्या कामात हस्तक्षेप करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यामुळे गावपातळीवरील वातावरण दूषित होत असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

रोजगार हमीची कामे सुरू करण्याबरोबरच जनावरांसाठी तालुक्यात तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. उसाचे दर वाढल्याने आणि चाऱ्यासाठी उसाशिवाय पर्याय नसल्याने महागडा चारा खरेदी करून जनावरे जगवणे शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याचे केकान यांनी सांगितले.

चारा छावण्यांमध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पाच रुपये दराने शिवभोजन केंद्र सुरू करावे, अशी मागणीही त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या घरात धान्याचा तुटवडा असून बाजारातून जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्यासाठीही हातात पैसा नसल्याने शासनाने तातडीने मदत करणे आवश्यक असल्याचे केकान यांनी सांगितले.

यावेळी गटविकास अधिकारी राजेंद्र धस यांनी शासनाने ठरविलेल्या निकषांनुसार पाणी वाटप केले जात असल्याचे स्पष्ट केले. वाढीव लोकसंख्येचा विचार करून प्रत्यक्ष सर्वेक्षणात आढळणाऱ्या लोकसंख्येनुसार पाणी वाटप केले जाते. गळक्या टँकरबाबत संबंधित चालक व मालकांना दुरुस्तीचे आदेश देण्यात आले असून, अकोले ग्रामस्थांच्या मागण्यांचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठविण्यात येईल, असे धस यांनी सांगितले.

# शेडगाव ग्रामपंचायतीच्या इमारतीचे भूमिपुजन

## ४० लाखांच्या निधीतून सुसज्ज कार्यालय उभारणार



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
शेडगाव (ता. श्रीगोंदा) येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या उभारणीच्या कामाचा शुभारंभ मंगळवारी (दि. ६) सकाळी साधेपणाने भूमिपूजन करून करण्यात आला. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनातून या इमारतीसाठी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

गावात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन भूमिपूजन सोहळा कोणताही मोठा खर्च किंवा दिखावा न करता साध्या पद्धतीने पार पडला. मंजूर निधीतून उभारण्यात येणाऱ्या या नवीन इमारतीमुळे ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजाला अधिक सुसूत्रता येण्याबरोबरच ग्रामस्थांना विविध शासकीय कामांसाठी आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

नवीन कार्यालयाची इमारत उभारण्याच्या कामाला सुरुवात झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. गावाच्या वाढत्या प्रशासकीय गरजा लक्षात घेता सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय ही सुविधा ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे.

भूमिपूजनप्रसंगी सावता परिषदेचे प्रदेश महासचिव तथा माजी सरपंच विजय शंकरराव शेडे, लक्ष्मणराव रसाळ, भीमराव बेलेकर, डॉ. जांभळे, शांताराम गोरे, किसन बेलेकर, विजय रसाळ, शाहुराज भोपळे, नानासाहेब शिंदे, शिवराज राजेभोसले, अमोल भोपळे, बिभीषण राऊत, बालाजी भोसले, डॉ. अमोल झेंडे, विलास रणसिंग, धनराज भोपळे, पोपटराव राऊत, डॉ. गिरमे, राजू खुडे, सचिन गोरे यांच्यासह ग्रामविकास अधिकारी शिंदे मॅडम, प्रशासक, विस्तार अधिकारी मांढरे साहेब तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर साधेपणाने झालेल्या या कार्यक्रमानंतर ४० लाखांच्या निधीतून शेडगावच्या नव्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या उभारणीला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.

# घाटघर-कोकणकडा परिसरातील ९ लाभार्थ्यांना डबल सीट सायकलींचे वाटप

## वन्यजीव सप्ताहानिमित्त ‘जन-वन विकास योजने’तून पर्यटनाशी निगडित रोजगाराची संधी उपलब्ध करण्याचा प्रयत्न

**● अकोले । वीरभूमी–**
कळसुबाई-हरिश्चंद्रगडच्या डोंगररांगा, धुक्याने झाकलेली शिखरे, दऱ्याखोऱ्यांतून वाहणारे वारे आणि कोकणकड्यावरून दिसणारे विहंगम दृश्य यामुळे हा परिसर पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे. या निसर्गसंपदेचे जतन करण्याबरोबरच स्थानिकांच्या जीवनात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण व्हाव्यात, या उद्देशाने वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून घाटघर-कोकणकडा परिसरातील गरजू स्थानिक लाभार्थ्यांना डबल सीट सायकलींचे वाटप करण्यात आले.



डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत कळसुबाई-हरिश्चंद्रगड वन्यजीव विभागाच्या वतीने मौजे घाटघर येथे नऊ लाभार्थ्यांना डबल सीट सायकली देण्यात आल्या. पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

कळसुबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्याचे उपवनसंरक्षक कृष्णा भवर, सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार, वनपरिक्षेत्राधिकारी रुपेश गावित, वन परिमंडळ अधिकारी अनिल साळवे आणि वनरक्षक महेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

घाटघर येथे झालेल्या कार्यक्रमास सरपंच एकनाथ खडके, समाजसेवक देविदास खडके, ग्रामस्थ, लाभार्थी, राजूर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिभा सोनवणे, वनपाल शंकर लांडे, प्रवीण गांगुर्डे यांच्यासह वन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

निसर्गसंपदेच्या सान्निध्यात राहणाऱ्या स्थानिकांना पर्यटनाशी जोडून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांना चालना देण्यात येत असल्याचे वन विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

# ‘जल्लोष-२०२६’मध्ये पारनेरच्या न्यू आर्ट्स कॉलेजची दमदार कामगिरी

## वक्तृत्व, मातीकलेत सुवर्णपदक । लेझीम, मूकनाट्य, प्रहसन आणि साहित्य विभागातही यश

**● पारनेर । वीरभूमी–**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने संगमनेर येथे आयोजित जिल्हास्तरीय ‘जल्लोष-२०२६’ युवक महोत्सवात न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेरच्या विद्यार्थ्यांनी विविध कलाप्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला. सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या या महोत्सवात पारनेरच्या विद्यार्थ्यांनी तब्बल १६ कलाप्रकारांत सहभाग नोंदविला.

वक्तृत्व आणि मातीकला या दोन स्पर्धांमध्ये पारनेर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदक पटकावले. वक्तृत्व स्पर्धेत आकाश मोहिते याने अभ्यासपूर्ण, ओघवत्या आणि प्रभावी शैलीतील सादरीकरणातून प्रथम क्रमांक मिळविला. मातीकला स्पर्धेत आकांक्षा शिंदे हिने कल्पकता, सूक्ष्म कलाकौशल्य आणि सर्जनशीलतेच्या जोरावर सुवर्णपदक मिळविले.

पारंपरिक भारतीय लोकनृत्य असलेल्या लेझीम तसेच आशयघन मूकनाट्य या प्रकारांत महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवत उपविजेतेपद पटकावले. समाजातील विविध ज्वलंत विषयांवर भाष्य करणाऱ्या प्रहसन तसेच साहित्य विभागाच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळविला. अशा प्रकारे एकूण सहा कलाप्रकारांत महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले.

विजेत्या विद्यार्थ्यांचा प्रसिद्ध लोककलावंत रघुवीर खेडकर यांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

पुस्तकी ज्ञानासोबत विद्यार्थ्यांमधील कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणे ही महाविद्यालयाची भूमिका आहे. ‘जल्लोष’मधील यश विद्यार्थ्यांच्या जिद्दीचे आणि मेहनतीचे फलित आहे, अशी प्रतिक्रिया प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी दिली.

या यशासाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. हरेश शेळके, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. प्रतीक्षा तनपुरे तसेच प्रा. सफिया तांबोळी, डॉ. प्रवीण जाधव, प्रा. आनंद पाटेकर, प्रा. दीपक खामकर, प्रा. गणेश रेपाळे, प्रा. शुभांगी काळोखे, डॉ. प्रांजली भराटे, प्रा. प्रांजल बोरुडे, प्रा. अनिकेत राऊत, प्रा. रोहिणी म्हसे, प्रा. ज्ञानेश्वर गुळगे आणि डॉ. अनिल ढोले यांनी विशेष परिश्रम घेतले.

